**या ई पुरवणीत:**

- **मुलाखत:** चिराग मनोहर: एक मराठी अमेरिकन अद्भुतकथा!
- **कथा:** हरवलेला शेवटचा मित्र

.....................................................................................................................................................................

# चिराग मनोहर: एक मराठी अमेरिकन अद्भुतकथा!

**मुलाखतकार: डॉ. उदयन आपटे**

**भाषांतर आणि संपादन: डॉ. प्रियदर्शन मनोहर**

चिराग मनोहरची ही इंग्रजी भाषेत-मुलाखत उदयन आपटे यांनी त्यांच्या ‘मराठी अमेरिकन रेडिओ’ पॉडकास्टसाठी घेतलेली आहे. पूर्वप्रसिध्दी: १६ ऑगस्ट, २०२०, पूर्ण मुलाखत खालील संकेतस्थळावर **ऐकता येईल.**

https://soundcloud.com/udayan-apte-623774607/mar009-curious-case-of-chirag-manohar

**उदयन:** चिराग मनोहर. एक अतिशय हुषार मराठी अमेरिकन मुलगा. मेडिकल-इंजिनीअरिंगची वहिवाट सोडून म्युझिकल थिएटर म्हणजे संगीत नाटकाचं प्रशिक्षण घेतो. प्रचंड कष्ट करून, लोकांच्या टीकेला न जुमानता, आईवडिलांच्या भक्कम पाठींब्यानं आणि शेवटी अमेरिकेतल्या व्यावसायिक नाटकांचं केंद्र असलेल्या न्यूयॉर्क मधल्या ब्रॉडवे वर पहिला मराठी अमेरिकन नट-कलाकार म्हणून पदार्पण करतो. ही आहे चिरागच्या त्या अद्भुत प्रवासाची कथा!

समजा आपण विष्णुदास भावे गौरव गीत आणि त्याच्या पाठोपाठ अमेरिकन रॅप गाणं ऐकलं तर काय होईल? ह्या दोघात काही संबंध आहे का असं आपल्याला वाटेल ना? आहे - जरूर आहे! ह्या दोन गीतांमधे एक सांस्कृतिक धागा आहे आणि तो म्हणजे आजच्या आपल्या अद्भुतकथेचा नायक चिराग मनोहर. मंडळी, आद्य नाटककार विष्णुदास भावे यांनी नाट्यपंढरी सांगलीमधे मराठी नाटकाची मुहूर्तमेढ रोवली. नऊ ऑगस्टला विष्णुदास भाव्यांचा स्मृतिदीन. पुढं नाटक हा मराठी जगण्याचा एक अविभाज्य घटक बनला. गेल्या काही दशकात कामकाजानिमित्त मराठी माणसं जगभर पसरली. पण जाताना नाटकाचं ते वेड डोक्यात घेऊन गेली, मनात ठेऊन गेली. आपापल्या परीनं जगाच्या कानाकोपऱ्यात मराठी नाटक जिवंत ठेवलं आणि मुख्य म्हणजे आपल्या मुलांना त्याचं बाळकडू पाजलं. मित्र हो! अशाच एका लेखन, नाटक ह्यांना भारलेल्या कुटुंबात जन्माला आलेल्या आणि अमेरिकेत वाढलेल्या एका मुलानं- चिराग मनोहर यानं आज अमेरिकेतल्या नाट्यपंढरीत म्हणजे न्यूयॉर्क मधल्या ब्रॉडवे वर दिमाखात पदार्पण केलं आहे. मराठी अमेरिकन मुलं भारतातल्या मुलांप्रमाणेच साधारणत: मेडिकल, इंजिनीअरिंग, वकिली ह्याच क्षेत्रात जाणं पसंत करतात. पण ही वहिवाट सोडून चिरागनं म्युझिकल थिएटर म्हणजेच संगीत नाटक ह्या विषयाचं शास्त्रशुध्द शिक्षण घेतलं आहे आणि आज तो ब्रॉडवे वर रोज हजारो रसिकांचं मनोरंजन करणाऱ्या नाटकात अभिनेता म्हणून काम करतो आहे. आजच्या एपिसोड मधील कथा आहे ती चिरागच्या ह्याच अद्भुत प्रवासाची.



सर्वप्रथम - चिरागची ओळख अर्थात त्याच्याच शब्दात.

**चिराग:** नमस्कार! माझं नाव चिराग मनोहर. मी एक व्यावसायिक नट आहे आणि मार्च २०२० पर्यंत ब्रॉडवे वरच्या "मीन गर्ल्स" ह्या संगीत नाटकात मी पूर्णवेळ काम करत होतो. (पॅंडेमिकमुळे मार्चनंतर सगळी नाट्यगृहं आणि सिनेमागृहं बंद करण्यात आली आहेत).

**उदयन:** सुदैवाने चिरागचा हा प्रवास मला बराच जवळून बघता आला. चिरागची आई अनघाताई आणि वडील प्रियदर्शन उर्फ सुधीर मनोहर ह्याची ओळख जरी नाटकामुळे झाली असली तरी आमचं नातं वेगळंच. अनघाताई तर मोठ्या बहिणीसारखीच. चिराग पाचवी/सहावीत असल्यापासून मी त्याला बघतो होतो. पण महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात छोट्या नाटुकल्या सादर करणाऱ्या चिरागला नाटकाचं वेड केव्हा लागलं हा प्रश्न मला पडला होता. चिराग! संगीत नाटकाची आणि तुझी ओळख कशी झाली? तू संगीत नाटकाचा गंभीरपणे कधी विचार करू लागलास? आपण एक व्यावसायिक नट व्हावं असं तुला प्रथम कधी वाटलं?

**चिराग:** नाटकांची आणि माझी ओळख माझ्या मोठ्या भावामुळे झाली. तेव्हा तो त्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेच्या नाटकांमध्ये काम करत असे. त्याचे प्रत्येक नाटकाचे चार प्रयोग होत असत. मी माझ्या आईवडिलांकडे ते सगळे प्रयोग बघायला जाण्याचा हट्ट करत असे. सगळ्यात पुढच्या रांगेत मधोमध बसून मी ती नाटकं पाहत असे आणि त्याची जादू माझ्या मनावर पडली होती. माझा भाऊ त्याला मिळालेली त्यांच्या नाटकाच्या गाण्यांची सीडी मला देत असे. ती गाणी मला पाठ व्हायची. तो बारावी पास होऊन कॉलेजला गेला तेव्हा त्याच्या शाळेच्या नाटकात दुय्यम भूमिकेसाठी दोन छोट्या मुलग्यांची गरज होती. मी तेव्हा सहावीत होतो पण माझ्या भावाने दिग्दर्शकाकडे माझ्या नावाची शिफारस केली आणि मला त्या नाटकात काम मिळालं. त्या क्षणापासून मी कधी मागे वळून पाहिलं नाही! नाटकाएव्हढी मजा दुसऱ्या कशातच यायची नाही! मला नेहमी वाटायचं आपण आधी नट व्हावं आणि मग अजून काहीतरी व्हावं. कारण खरं म्हणजे मला फक्त नटच व्हायचं होतं पण मला फक्त नट कोण होऊ देणार? ते तर शक्यच वाटत नव्हतं! म्हणून मग मी म्हणायचो मला नट व्हायचंय आणि मला गणिताचा शिक्षक व्हायचंय, किंवा मला नट व्हायचंय आणि मला शेफ व्हायचंय, किंवा मला नट व्हायचंय आणि मला वकील व्हायचंय! नट होण्याबरोबरच असं काहीतरी व्हायचंय की ज्याला समाज मान्यता असेल, त्या करियरला एक परिचय असेल. मग मी आर्ट्सला महत्त्व देणाऱ्या हायस्कूलमध्ये गेलो आणि जेव्हा बारावीच्या वर्षात असताना माझी कॉलेजला जायची वेळ आली, तेव्हा मी ह्याचा गंभीरपणे विचार करू लागलो. माझ्यासाठी कोणतं कॉलेज चांगलं ठरेल, ह्याचा विचार करताना बाबाने मला विचारलं, "चिराग! तुला कोण व्हायचंय? इंजिनिअर व्हायचं आहे का तुला?" हा प्रश्न ऐकताच मला रडायला यायला लागलं. माझ्या अंगावर तो प्रश्न वीज कोसळल्यासारखा पडला. मला वाटलं 'छे! छे! मला नट सोडून दुसरं कोणीच व्हायचं नाहीये.'

**उदयन:** आपल्या आयुष्याचा अर्थ आणि दिशा समजण्याचा तो क्षण काही विलक्षणच असेल नाही? पण चिराग ह्या क्षणापर्यंत पोचण्याची त्याची तयारी अनेक वर्षं झाली होती. कारण चिराग अशा एक हायस्कूलमध्ये गेला होता, की जिथे त्याला नाटकाचं शिक्षण मिळालं होतं. त्याची कथा ही जगावेगळीच आहे. कारण चिराग नाटक शिकवणाऱ्या खास हायस्कूलमध्ये गेला होता. चिराग! आम्हाला तुझ्या "कॅपा" शाळेची माहिती सांग बरं.

**चिराग:** माझ्या शाळेचं नाव "पिट्स्बर्ग कॅपा ६ - १२" म्हणजे सहावी ते बारावी क्रिएटिव्ह अँड परफॉर्मिंग आर्टस् (CAPA) शाळा. आर्ट्समध्ये विशेष गुणवत्ता असलेल्या मुलांसाठी असलेली ही खाजगी नाही, सरकारी (पब्लिक) शाळा आहे. ही शाळा एक विशेष शाळा - म्हणजे मॅग्नेट शाळा आहे. ह्या शाळेत प्रवेश मिळवण्याकरता मुलाखत (ऑडिशन) द्यावी लागते आणि तिथे तुमची गुणवत्ता सिध्द करावी लागते. त्या शाळेच्या फक्त शनिवारच्या प्रोग्रॅमसाठी मी आधीपासूनच तिथे जात असे पण सातवीपासून पूर्णवेळ त्या शाळेत मी जायला लागलो. आधी मी व्हायोलिन मेजर म्हणून तिथे मला प्रवेश मिळाला. पण हळूहळू मला संगीत नाटकाची आवड लागली आणि मी व्हायोलिन सोडून संगीत नाटकाकडे वळलो. शनिवारच्या प्रोग्रॅमच्या संचालिका मिसेस स्टेबलर ह्या त्या शाळेतल्या नाट्यविभागाच्या प्रमुख होत्या आणि त्यांनीच माझ्या आईवडिलांना मला ह्या शाळेत पूर्णवेळ घालण्याचा आग्रह केला. पण माझ्या आईवडिलांना काळजी वाटली, की ह्या आर्ट्सच्या शाळेत गणित-सायन्स वगैरे विषयांचं शिक्षण काय दर्जाचं असेल? मिसेस स्टेबलरनी माझ्या आईवडिलांना शाळेत बोलावून घेतलं आणि सगळ्या विषयाचं सिलॅबस आणि सखोल वर्णन असलेली पॅकेट्स त्यांना दिली. शाळा आणि लॅब्ज फिरून दाखवल्या आणि त्यांना पटवून दिलं, की आर्टस् शिकवताना बाकीच्या विषयांकडे तितकंच लक्ष दिलं जातं. त्या बाबतीत शिक्षणात कुठेही कमतरता पडत नाही. थोडक्यात म्हणजे ह्या शाळेत मी काही दिवसभर गोट्या खेळत बसणार नाहीये! सत्य परिस्थिती तर ह्याच्या बरोब्बर उलट होती! ह्या शाळेत जायचं म्हणजे नेहमीची पूर्ण वेळ शाळा झाल्यानंतर रोज कमीत कमी तीन ते चार जास्तीचे तास मला माझ्या आर्ट्सच्या शिक्षणासाठी द्यावे लागणार होते!

**उदयन:** तुझ्या नाट्यशिक्षणाबद्दल तुझ्या आई - वडिलांची सहजासहजी खात्री पटली का?

**चिराग:** माझ्या आईची खात्री पटायला जास्त वेळ लागला! मला आठवतं, माझ्या आजोबांनी आईवडिलांना फोन केला आणि समजावलं. ते म्हणाले, चिरागला शिक्षणाच्या ज्या संधी त्या देशात उपलब्ध आहेत त्यांचा फायदा घ्यायला तुम्ही त्याला देणार नसाल, तर मग तुम्ही अमेरिकेत जाण्याचा फायदा काय? आजोबांच्या बोलण्याचा परिमाण झाला आणि मला कॅपा शाळेत जायला मिळालं.

**उदयन:** चिराग ज्या आजोबांबद्दल बोलतोय ना, ते म्हणजे मराठीतले सुप्रसिध्द लेखक अनंत मनोहर. राब, जेष्ठ, द्वारकाविनाश, अरण्यकांड या पुस्तकांचे लेखक. चिरागला मराठी साहित्याचा, नाटकाचा हा जो वारसा लाभला आहे तो फार महत्त्वाचा आहे. हे जे कॅपा स्कूल आहे त्यात प्रवेश मिळाला तो म्युझिकल थिएटर या स्पेशलायझेशनमधे. परंतु नाटकाला, संगीताला, नृत्याला, लेखनाला खूप महत्त्व देणारी ही शाळा म्हणजे फक्त मजा आणि धमाल नव्हती बरं का. वयाच्या तेरा-चौदाव्या वर्षी रोज चौदा-सोळा तास काम करण्याची तयारी असणं हेही एक नवलच. चिराग, तुझ्या शाळेची आणि तिथल्या नाट्यशिक्षणाची अधिक माहिती आम्हाला दे. तू तिथे संगीत नाटकाचं शिक्षण घ्यायचं का ठरवलंस?
**चिराग:** मी संगीत नाटकाच्या मेजरसाठी तिथे अर्ज केला होता. मी मुलाखत दिली आणि माझी निवड झाली. भावाच्या शाळेच्या नाटकांतून काम करत असताना मला मनोमन जाणवलं होतं, की संगीत नाटक हेच माझं क्षेत्र आहे. अभिनय, गायन आणि नृत्य ह्या तीनही कला एकत्र आणणारं हे क्षेत्र आहे आणि त्यांची मला मनापासून आवड आहे. कॅपा शाळेचा सर्वसामान्य दिवस सकाळी ०७:३० वाजता सुरू होत असे. १२:३० ते ०१:०० वाजेपर्यंत नेहमीची शाळा - गणित, विज्ञान, भाषा, इतिहास भूगोल वगैरे नेहमीचा अभ्यासक्रम. मग जेवणाची अर्धा तास सुट्टी. त्यानंतर सुमारे अडीच तास तुमचा आर्ट्सचा विशेष अभ्यासक्रम करावा लागतो. माझ्या बाबतीत संगीत नाटकाचा अभ्यास. ह्यामध्ये अभिनय, नृत्य, गायन, आवाजाची तालीम (व्होकल ट्रेनिंग), संगीताची थिअरी, नाटकांचा इतिहास - म्हणजे संगीत नाटकांच्या दृष्टीने सर्व बाजूंनी अभ्यास होता. साडेतीन वाजता शाळा सुटली, की मी परस्पर थेट एका डान्स स्टुडियोमध्ये अजून तीन ते चार तास नृत्य प्रशिक्षणासाठी जात असे.

**उदयन:** तू हे अतिरिक्त डान्स क्लासेस का केलेस?
**चिराग:** त्याचं कारण म्हणजे तोपर्यंत मी नृत्य शिकलो नव्हतो. अभिनय आणि गायन मला थोडं येत असे पण नृत्याच्या बाबतीत मी कच्चा होतो. मी कधी जॅझ, बॅले, टॅप असे नृत्यप्रकार शिकलोच नव्हतो. आणि कॅपा शाळेतल्या पहिल्याच सत्रात मला नृत्याच्या क्लासमध्ये 'B' श्रेणी मिळाली! आणि तुला माहीतच आहे, की भारतीय पालकांना आपल्या मुलाला शाळेत बी श्रेणी मिळणं म्हणजे महापातक वाटतं! ही भयंकर घटना कधीच घडायला नको असते! मग आईबाबा माझ्या डान्स टीचरला येऊन भेटले आणि त्यांनी त्याला विचारलं, की चिरागने त्याची श्रेणी सुधारण्यासाठी काय करायला हवं. तेव्हा माझ्या टीचरने त्यांना सांगितलं, की चिरागला अवांतर नृत्य शिक्षणाची गरज आहे. म्हणून शाळेनंतर हा डान्स क्लास त्यांनी मला लावला.

**उदयन:** मंडळी, चिरागच्या आईवडिलांचे इथे मला खूप कौतुक करावंसं वाटतं. गणित चांगलं नाही, म्हणून शिकवण्या लावणारे पालक तर अनेक असतात पण आपल्या मुलानं संगीत नृत्यनाट्य शिकवायचा घाट घातला आहे आणि त्या मधलं नृत्याचं अंग कच्चं आहे, म्हणून त्याला खास नाचाची शिकवणी लावणारे पालक कितीसे असतात? पण आईबाबांचा जरी भक्कम आधार असला, तरी उर्वरीत मराठी अमेरिकन समाजाचं काय? त्यांची प्रतिक्रिया हा मुलगा नक्की काय करतोय ह्याबद्दलची चिंता, संशय, अविश्वास आणि आपल्या हुषार मुलाचं आयुष्य त्याला पाहिजे ते करू देऊन वाया घालवणाऱ्या आईवडिलांवर राग अशी काहीशी होती. चिराग, मला असं सांग, की तू ह्या एकमेवाद्वितीय अशा आर्टस् शाळेत जायचं ठरवलंस तर मग तुमच्या ओळखीच्या मराठी अमेरिकन समाजाची काय प्रतिक्रिया झाली?
**चिराग:** मी काय करतोय ह्याची लोकांना काही कल्पनाच आली नाही. कारण प्रोफेशनल म्युझिकल थिएटर ही अमेरिकन आर्ट आहे. त्यांनी स्वतः कधी हे केलं नाही, त्यांच्या आईवडिलांनी केलेलं त्यांनी कधी पाहिलेलं नाही त्यामुळे त्यांच्या मुलांना ते करू देणार नाहीत. सगळ्यांना ह्या धंद्यातला अनिश्चततेचा प्रचंड धोका मात्र नक्कीच जाणवतो. जर कोणी म्हणालं, 'मी नट होणार आहे' तर त्यावर पहिली प्रतिक्रिया म्हणजे डोळे फिरवून लोक म्हणतात 'शुभेच्छा!' कारण इथे इतकी बेकारी आहे, नोकरीची कसलीही शाश्वती नाही. अशा परिस्थितीशी सामना करायला म्हणून माझ्या आईवडिलांनी माझ्याशी एक सौदा केला; तो हा, की जर मला सर्वोत्कृष्ट कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला तरच ते मला ह्या क्षेत्रात जाऊ देतील.

**उदयन:** कॅपा स्कूल मधे चिरागनं चार वर्षं गणित, शास्त्र, भाषा वगैरे नेहेमीच्या विषयांबरोबरच म्युझिकल थिएटरचा अभ्यास केला. जेव्हा कॉलेजला जायची वेळ आली, तेव्हा आपण व्यावसायिक कलाकार होणार हा निश्चय केला आणि ह्या विषयाचं सर्वात उत्तम शिक्षण कुठं मिळेल ह्याचा शोध सुरू झाला. म्युझिकल थिएटरमधे बॅचलर ऑफ फाईन आर्टस्‌चा कोर्स बऱ्याच विद्यापीठात शिकवला जातो. चिरागने बऱ्याच विचाराअंती न्यूयॉर्क राज्यातल्या सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीमधे प्रवेश घेतला. चिराग, तू सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीत प्रवेश का घेतलास?
**चिराग:** ह्या माझ्या निर्णयामागे तीन मुख्य कारणं होती. त्यातलं पहिलं कारण म्हणजे सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीचं ड्रामा डिपार्टमेंट 'सिरॅक्यूज स्टेज' ह्या नाट्यसंस्थेशी जोडलेलं आहे. 'सिरॅक्यूज स्टेज' ही एक प्रादेशिक व्यावसायिक नाट्यसंस्था आहे. त्यामुळे सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना सिरॅक्यूज स्टेजच्या नाटकांमध्ये काम मिळायची संधी प्राप्त होऊ शकते. ह्याचा अर्थ युनिव्हर्सिटीत राहून चार वर्षांची पदवी मिळवतानाच तुम्हाला व्यावसायिक स्टेजवर काम केल्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळवता येतो. माझ्या दृष्टीने सिरॅक्यूजची दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पदवीच्या चार वर्षातलं शेवटचं सत्र - ज्याला ते 'टेपर सेमेस्टर' म्हणतात. हे सत्र सिरॅक्यूजला न करता ते सेमिस्टर न्यू यॉर्क शहरात होतं. सगळ्या ग्रॅज्युएटिंग क्लासला ते न्यू यॉर्क शहरात घेऊन जातात. तुमचे उरलेले क्लासेस तिथेच होतात आणि त्याच बरोबर न्यू यॉर्क शहरात जी नाटकं बसवली जातात तिथे जाऊन तुम्हाला ऑडिशन देता येते. तिथे अवांतर डान्स क्लासेस घेता येतात. तिसरी गोष्ट म्हणजे तुम्हाला तुमचं अपार्टमेंट भाड्याने घेऊन स्वतःची राहण्याची सोय करता येते. तिथे राहून ह्या नाट्यक्षेत्रातल्या निर्माते, दिग्दर्शक इत्यादी महत्त्वाच्या लोकांच्या ओळखी होतात. तुमच्या कॉलेजचे आधीचे सीनियर पदवीधर (अल्युम्नी) ह्यांच्याशी ओळखी होतात. म्हणजे पदवी हातात पडतानाच तुमचं न्यू यॉर्क शहरामध्ये बस्तान बसलेलं असतं. तुमच्या व्यावसायिक ओळखी झालेल्या असतात आणि कदाचित एखादी नोकरीही मिळून गेलेली असते!

**उदयन:** अमेरिकेतला हा थिएटर डिग्री कोर्स कसा असतो, ह्या बद्दल मला फार कुतूहल होतं. चिराग, तुझ्या ह्या पदवीच्या अभ्यासक्रमात तू काय काय शिकलास?
**चिराग:** सिरॅक्यूजच्या पहिल्या वर्षी दर आठवड्यातून तीन दिवस सकाळी आठ वाजता सुरू होणारा सलग चार तासांचा क्लास असे. त्यात चार वेगवेगळे अभिनयाचे, नृत्याचे, आवाजाचे प्रोफेसर येऊन शिकवत असत. तो क्लास संपल्यावर अगदी थकून जायला होत असे. ते प्रोफेसर विद्यार्थ्यांकडून अत्युच्च व्यावसायिकतेची अपेक्षा करतात आणि त्यामुळे इथून पुढची चार वर्षं कशी जाणार आहेत ह्याची कल्पना येते. पण पहिल्याच वर्षी अशी सुरुवात केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनाची तयारी होते. प्रोफेसर विद्यार्थ्यांना व्यावसायिक नटासारखेच समजतात आणि त्याच जबाबदारीने ते वागतील अशी अपेक्षा करतात. थिएटरच्या व्यवसायाकडे सर्व बाजुंनी म्हणजे ३६० डिग्रीतून पाहायला शिकवलं जातं. अभिनय, नृत्य आणि गायनाबरोबरच पहिल्या वर्षी 'नाटकाशी ओळख' (इंट्रो टू थिएटर) असा एक क्लास वर्षभर असतो. ह्याच्यामध्ये सुप्रसिध्द अमेरिकन आणि क्लासिक नाटकांशी परिचय करून दिला जातो. ग्रीक नाटकांशी ओळख होते. अशा नाट्यसंहितांचा अभ्यास होतो, की ज्या संहितांनी मुळातून नाट्यशात्र निर्माण केलं. नाटकांचं विश्लेषण, तेही नटाच्या भूमिकेतून तसेच शिक्षणाच्या (अकॅडेमिक) भूमिकेतून विश्लेषण करायला शिकवलं जातं. एखाद्या विशिष्ट नाटकाची समज इतर नाटकांच्या पार्श्वभूमीवर आणि त्यांच्या संदर्भात काय आहे, ह्याचा विचार आपण करू लागतो. त्यामुळे एखाद्या भूमिकेसाठी आपण ऑडिशन द्यायला जातो तेव्हा नटाला ही जाणीव झालेली असते, की ती भूमिका एखाद्या निर्वात पोकळीत निर्माण झालेली नाही - त्याला कोणतीतरी चौकट आहे. उदाहरणार्थ शेक्सपियरचं एखादं नाटक बसवताना शेक्सपियर ज्या जगात राहून नाटकं निर्माण करत होता त्या जगाची समज आल्याशिवाय ते नाटक समर्थपणे बसवता, करता येणार नाही. हे शिकण्यासाठी आम्हाला गद्य नाटकांचे क्लास होते, मग संगीत नाटकांच्या इतिहासाचे क्लास होते. ह्याच्याव्यतिरिक्त प्रसिध्द संगीतकार, प्रसिध्द कवी, प्रसिध्द निर्माते ह्यांची माहिती देणारे क्लास होते. इतका अभ्यास व्हायचा, की शेवटी कोणी एखाद्या नाटकाचं नुसतं नाव जरी घेतलं, तरी ह्याचा लेखक कोण आहे, ह्यात पहिल्या प्रयोगात कुणी भूमिका केल्या होत्या, हे नाटक का लिहिलं गेलं, ह्या नाटकामागची प्रेरणा कोणती होती, ह्या नाटकासंबंधी कोणता विशेष अभ्यास केला गेला आहे हे चटकन ध्यानात यायचं. शिवाय म्युझिक थियरीचे क्लासेस होते. सिरॅक्यूजला शिकताना मजा येते कारण नाटक व्यापक भूमिकेतून शिकायला मिळतं. आमचे प्रोफेसर्स म्हणजे विविध पार्श्वभूमी असलेल्या ,नाट्यक्षेत्रातले वेगवेगळे अनुभव गाठीशी असलेल्या व्यक्ती होत्या. शिवाय प्रत्येकाने कधी ना कधी नाटकांचं दिग्दर्शन केलेलं होतं. त्यामुळे सिरॅक्यूजच्या दोन वर्षात समजा तुम्हाला चार नाटकांत काम करायची संधी मिळाली तर चार वेगवेगळ्या मार्गांनी नाटक कसं बसवता येतं, कसं दिग्दर्शित केलं जातं हे आपोआप शिकायला मिळायचं. व्यक्तिरेखा कशी उभी करायची, नाटकाची चौकट कशी ठरवायची ह्याचे अनेक मार्ग कळल्यानंतर मग आपल्याला जो मार्ग पटतो आणि आवडतो त्या मार्गाने किंवा त्या दिशेने आपण पुढे जाऊ शकतो.

**उदयन:** केव्हढा विचार करून तयार केला आहे हा सिलॅबस. चिरागला नुसतंच टेक्निक नाही, तर नाटकाबद्दल वेगळा विचार करायला आणि तो प्रत्यक्षात अंमलात आणायला शिकवले गेलं. चिरागनं सिरॅक्यूजमध्ये चार वर्षात बॅचलर ऑफ फाईन आर्ट्सची पदवी मिळवली. त्या काळात त्यानं वेगवेगळ्या सुमारे पंधरा नाटकात कामं केली. आणि त्याच्या सुदैवाने शिक्षण संपताक्षणी त्याला ब्रॉडवे कामही मिळालं. 'टिना फे' ही अमेरिकेतली प्रसिध्द विनोदी अभिनेत्री. तिनं लिहिलेला अमेरिकेतील हायस्कूल जीवनावर, टीन एज जीवनावर आधारित 'मीन गर्ल्स' हा चित्रपट खूप गाजला होता. त्या चित्रपटाचं नाट्य रूपांतर करण्याची उलटी गंगा वाहण्याचं काम टिना फे त्या काळात करत होती. आणि चिरागला ब्रॉडवे वर नव्याने चालू होणाऱ्या 'मीन गर्ल' ह्या संगीत नाटकात भूमिका मिळाली. त्याची कहाणी खरंच रोमहर्षक आहे. चिराग, तर तू सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीतून पदवीधर झालास आणि न्यू यॉर्क शहरात गेलास. मग तिथे तुला "मीन गर्ल्स" नाटकात कशी संधी मिळाली?

**चिराग:** मीन गर्ल्सच्या गोष्टीची सुरुवात माझ्या दृष्टीने एका मोठ्या निराशाजनक अवस्थेतच झाली. त्या उन्हाळ्यात मी काही जॉब मिळवले होते. विशेषतः मला "डिसग्रेस्ड" ह्या नाटकात भूमिका मिळाली होती. विशेष अशासाठी की मी पाहिलेलं पहिलं ब्रॉडवे वरचं ते नाटक होतं. ह्या आधी तीन वेळा मला ह्या नाटकात भूमिका मिळाली होती आणि तीनही वेळा कॉलेजच्या काही ना काही उपक्रमामुळे मला त्या संधींवर पाणी सोडावं लागलं होतं. त्यामुळे ह्या चौथ्या संधीची मी आतुरतेने वाट बघत होतो. ह्या वेळी माझं कॉलेजचं शेवटचं सत्र होतं आणि हँगर थिएटर आणि पोर्टलॅंड सतेज ह्या नामांकित कंपन्यामिळून हे नाटक बसवणार होते ज्याच्यात मला भूमिका मिळाली होती! बारा आठवडे हे नाटक चालणार होतं. ह्या कामाच्या अनुभवावर मला ॲक्टर्स युनियनची मेंबरशिप मिळाली असती आणि मला व्यावसायिक कलाकार म्हणून मान्यता मिळाली असती. ती भूमिका मला आवडली होती आणि ती मिळण्यासाठी मी मनापासून प्रयत्न केले होते. इतकी वर्षं मी ह्याची वाट पाहात होतो. शिवाय ती भूमिका करण्याचे हजारो डॉलर्स मिळाले असते ते वेगळंच! आणि झालं काय, की मी पदवीधर होण्याआधी केवळ एक महिना असताना हँगर थिएटरने जाहीर केलं, की हा शो पुढे आणण्यात येत आहे. म्हणजे माझ्या सगळ्या फायनलच्या परीक्षा ज्या काळात आयोजित होत्या त्याच काळात या नाटकाच्या प्रयोगांस सुरूवात होणार होती! मला हे नाटक करणं आता शक्यच झालं नसतं. मला ती संधी सोडून द्यावी लागली आणि त्यामुळे,  ज्या वेळी मी पदवीधर झालो तेव्हा इतका दुःखीकष्टी झालो होतो, की इतकी सुवर्णसंधी हातातून निसटली, इतका मानसिक ताण आला की परीक्षा झाल्यावर मनःशांती मिळवण्यासाठी मी दोन आठवडे घरी गेलो. म्हटलं दोन आठवडे कशाचाही विचार न करता आपल्या कुटुंबियांबरोबर वेळ घालवावा.

घरी गेल्यावर प्ले बिल डॉट कॉम ह्या वेबसाईटवर मी 'मीन गर्ल्स" नाटकाच्या ऑडिशनची नोटीस पाहिली. ते फक्त चार भूमिकांसाठी नट शोधत होते. त्यांचा बाकीचा नटसंच तयार होता कारण त्यांनी "प्रॉडक्शन लॅब" धर्तीवर हे नाटक आधीच बसवलेलं होतं. प्रॉडक्शन लॅब नाटक म्हणजे कमितकमी वेशभूषा आणि सेट्स वापरून नाटक करणे. अशा प्रयोगांना 'मनी पीपल' - उर्फ 'श्रीमंत लोकांना' बोलावलं जातं. त्यांना हे नाटक आवडलं तर मग ह्या नाटकाच्या निर्मितीसाठी लागणारा पैसा उभा करता येतो. त्यामुळे सगळा नटसंच तयार होता आणि फक्त चार भूमिकांसाठी ते पात्रं शोधात होते. त्यातलं एक पात्र 'केव्हिन नपुर' होतं. ह्या पात्रासाठी त्यांनी लिहिलं होतं, की वयाने अठरा वर्षांहून मोठा मुलगा पण जो हायस्कूलमध्ये जाणारा मुलगा शोभू शकेल असा तरुण दिसणारा, विनोदी अंग असलेला, रॅप गाणं म्हणता येणारा, आणि जो भारतीय किंवा पाकिस्तानी वंशाचा आहे, असा हवा. हे मी वाचलं आणि मनात विचार आला - अमेरिकेत अशी कितीशी मुलं त्यांना मिळणार आहेत? आणि त्यांनी अशी पब्लिक जाहिरात दिली असेल तर ह्याचा अर्थ त्यांच्या डोळ्यांसमोर सध्या तरी कोणी नसावं - म्हणजे आपल्याला संधी मिळू शकते! मी अर्ज तयार केला आणि न्यू यॉर्क मध्ये त्यांच्या ओपन ऑडिशनच्या दिवशी प्रत्यक्ष हजर झालो. त्यासाठी मी स्वतः एक विडंबन गीत रचलं होतं (फ्रेश प्रिन्स ऑफ बेल एअर ह्या सुप्रसिध्द टीव्ही मालिकेच्या शीर्षक गीतावर आधारलेलं) जे रॅपच्या धर्तीवर गाता येतं आणि जे विनोदी होतं. त्यांना माझं गाणं आवडलं. त्यांनी दुपारी पुन्हा मला बोलावलं आणि मला नृत्य करायला सांगितलं. तेव्हापासून पुढे नऊ वेळा त्यांनी मला ऑडिशनसाठी बोलावलं! अडीच/तीन आठवडे ही निवड आणि छाननी प्रक्रिया चालू होती!




**उदयन:** चिराग च्या बाबतीत right place at the right time हे अतिशय सयुक्तिक आहे. हाती असलेलं छोटं काम जातं काय, आणि एकदम ब्रॉडवे वर जायची संधी काय मिळते! पण मित्रहो त्यातले चिरागचे कष्ट आणि त्याची चिकाटी वाखाणण्यासारखी आहे. पहिली ऑडिशन धरून एकंदर दहा ऑडिशन्स? डोकं शांत ठेवून हे करणं सोपं नाही. बऱ्याच श्रोत्यांना ब्रॉडवे म्हणजे काय असा प्रश्न पडला असेल. मी हाच प्रश्न चिरागला विचारला. तर चिराग, ह्या नाटकाबद्दल आधी माहिती सांगण्यापूर्वी ब्रॉडवे म्हणजे काय ते सांग बरं आम्हाला.
**चिराग:** ब्रॉडवे म्हणजे एक तऱ्हेने थिएटरच्या प्रकाराचं नाव आहे, संज्ञा आहे. न्यू यॉर्क मध्ये थिएटरचा प्रकार त्यात किती सीट्स आहेत ह्यावरून ठरवला जातो. उदारहरणार्थ अगदी छोट्या म्हणजे जास्तीत जास्त ९९ सीट्सपर्यंत कपॅसिटी असलेल्या थिएटर्सना 'ऑफ ऑफ ब्रॉडवे थिएटर' म्हणतात, १०० ते ४९९ सीट्स असलेल्या थिएटर्सना 'ऑफ ब्रॉडवे थिएटर' म्हणतात तर ५०० हुन अधिक सीट्स असलेल्या मोठ्या थिएटर्सना 'ब्रॉडवे थिएटर' म्हणतात. आमच्या नाटकाच्या थिएटरमध्ये १२०० सीट्स आहेत आणि आमचे बहुतेक सगळे शो हाऊसफुल्ल असतात; पण तरी आमचं थिएटर तसं लहानच समजलं जातं! कारण 'विकेड' आणि 'लायन किंग' सारख्या नाटकांच्या थिएटर्समध्ये हजारो सीट्स आहेत आणि त्यांचे शो सुध्दा हाऊसफुल्ल असतात. ब्रॉडवे नाटकांचे दर आठवड्याला एकूण आठ शोज असतात. त्यात सहा शो रात्रीचे आणि दोन शोज दिवसाचे म्हणजे मॅटने असतात किंवा कधी कधी पाच शो रात्रीचे आणि तीन शोज मॅटने असतात. म्हणजे दर आठवड्याला सहा दिवस काम करावं लागतं आणि एक दिवस - सोमवारचा दिवस सुट्टी मिळते.

**उदयन:** न्यूयॉर्क सिटी मधे ब्रॉडवे नावाचा रस्ता आहे त्या रस्त्यावर आणि आजूबाजूला शंभरांपासून काही हजार सीट्स असलेली सुमारे पन्नास वेगवेगळी नाट्यगृहं आहेत. विचार करा, पन्नास नाट्यगृहात वेगवेगळी पन्नास नाटकं. लंडन मधील ‘वेस्ट एंड’च्या बरोबरीनं ब्रॉडवे हे जगातलं सर्वात मोठं व्यावसायिक नाटकाचं केंद्र आहे. बाकी जगभरात पाच दिवसांचा कामाचा आठवडा पण इथं मात्र सहा दिवसांचा. आणि बाकीच्यांना जेव्हा सुट्टी तेव्हा तर ब्रॉडवेचा जोरात सिझन. त्यामुळं सुट्टी अशी नाहीच. लाखो डॉलर्सचं बजेट, पन्नास ते शंभर कलाकार आणि सगळ्याच गोष्टींचा जबरदस्त वेग. ह्या अफाट व्यावसायिक स्पर्धा असलेल्या आणि अस्सल प्रोफेशनॅलीझमची मागणी करणाऱ्या नाटकांच्या तालमी तशाच धड्याक्यात होतात. चिरागसारख्या नवशिक्यासाठी ही तर खरी परीक्षा होती. चिराग मला असं सांग, की कॉलेजमधून बाहेर पडून ब्रॉडवे वर रिहर्सलसाठी पाऊल टाकण्याचा तुझा अनुभव काय होता.
**चिराग:** कॉलेजचा बॅचलर ऑफ फाईन आर्टस् प्रोग्रॅम तुमच्या पुढच्या व्यावसायिक करीअरची सगळी आव्हानं तुम्हाला पेलता यावीत म्हणून तुमची जास्तीत जास्त तयारी करून घेतो, ह्यात काही वादच नाही. पण तरीसुध्दा ब्रॉडवे रिहर्सलच्या पहिले दोन आठवड्यात जे

काही घडतं, त्याची तयारी कुठलीही शाळा, कुठलंही कॉलेज करून घेऊ शकत नाही! त्या आव्हानाला तुलनाच नाही! तो इतका प्रचंड सावळा गोंधळ असतो, की काय सांगू. माझ्या पहिल्या दिवशी मी रिहर्सलला गेलो, अनेक लोकांच्या भेटी झाल्या आणि मग ते मला म्हणाले, की आपण ह्या संपूर्ण नाटकाचं वाचन आणि त्यातलं गायन करणार आहोत! आणि अजून मला नाटकाची संहिता मिळायचीच होती, बरं का! तर ते म्हणाले, ही घे संहिता! आता त्या खोलीत जा - हा तुझा संगीत दिग्दर्शक आणि पुढच्या दहा मिनिटात तुझ्या एकट्याने गायच्या गाण्यांच्या चाली त्याच्याकडून समजावून घे आणि रिहर्सलला तयार हो! आणि खरंच पहिल्या दिवशी दुपारी आम्ही सगळ्या नाटकाचं वाचन आणि गायन केलं! आणि पुढची गंमत म्हणजे त्यावेळी मला हे माहीत नव्हतं, की त्या दोन आठवड्यातला हा माझा सगळ्यात सोपा दिवस ठरेल! ते संपूर्ण नाटक केवळ नऊ दिवसात बसवलं गेलं! सुरुवातीपासून शेवटपर्यंत. खरंच ती 'तरा नाहीतर बुडा' अशी परिस्थिती होती आणि बुडण्याचा पर्याय तुमच्याकडे नव्हताच! नाटक बसलं, की ब्रॉडवे शोज "प्रिव्ह्यूज" करतात. ह्या प्रिव्ह्यु खेळांना तिकिटं काढून प्रेक्षक उपस्थित होतात. मग दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा तालीम होते. आदल्या दिवशीचा खेळ लेखक, दिग्दर्शक, संगीतकार, नृत्यदिग्दर्शक काळजीपूर्वक बघत आणि ऐकत असतात. प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया बघत असतात. प्रेक्षकांना काय आवडलं, काय आवडलं नाही, कुठे नाटकाने पकड घेतली, कुठला भाग रेंगाळला, कुठल्या विनोदाला लोक हसले आणि कुठला विनोद जमला नाही ह्याचा त्यांचा अभ्यास चालू असतो. मग रात्रभर ते त्याच्यावर काम करतात आणि दुसऱ्या दिवशी नटसंच तालमीला आला की दहा पासून ते पन्नास पर्यंत संहितेची नवी पानं त्यांनी तयार केलेली असतात! नवे सीन्स, नव्या हालचाली, नवी गाणी, नवी कोरिओग्राफी सगळं काही असतं त्यात. आता ह्या नव्या गोष्टी दिवसभरात शिकायच्या, तालमी करायच्या आणि रात्रीच्या प्रयोगात सादर करायच्या! मला आठवतं आहे, वॉशिंग्टन डीसी मध्ये एक आठवडा असा गेला, की त्यातल्या आठही प्रयोगात सुरुवातीची पहिली वीस मिनिटं वेगळी होती! प्रत्येक प्रयोगात वेगळी सुरुवात! ब्रॉडवे'वर नाटक सादर करण्यापूर्वी वेगळ्या गावात आधी प्रयोग करतात; प्रेक्षकांना नवं नाटक कसं काय आवडतं आहे ह्याचा अंदाज घेण्यासाठी आणि संहिता पक्की करण्यासाठी! आमचं नाटक वॉशिंग्टन डीसीला झालं. सप्टेंबरमध्ये त्यांच्या तालमी आणि ऑक्टोबर ते डिसेंबर त्यांचे शोज झाले. मग ब्रॉडवे शोजसाठी न्यू यॉर्क मध्ये फेब्रुवारीत तीन आठवडे तालमी झाल्या आणि मार्चमध्ये चार आठवडे प्रिव्ह्यू शोज झाले आणि एप्रिलमध्ये (२०१८ साली) ब्रॉडवेवर आमच्या नाटकाचं पदार्पण झालं!

**उदयन:** नऊ दिवसात संपूर्ण व्यावसायिक नाटक बसवलं गेलं. नऊ दिवसात...आधी रोज बदलणारे प्रिव्ह्यू शोज् आणि मग रोज नव्या बाराशे रसिकांसमोर आठवड्यातले सहा दिवस प्रयोग. मंडळी फक्त २०१९ च्या सीझनमधे ब्रॉडवे वर चौदा मिलीयन लोकांनी म्हणजे एक कोटी सत्तेचाळीस लाख लोकांनी नाटकं बघीतली ते ही वन पॉईंट एट बिलीयन, ब बदकातला... बिलीयन डॉलर्स खर्च करून!! विचार करा. इथे अमेरिकेत शेकडो टीव्ही चॅनल्स आहेत, एनएफएल, एनबीए वगैरे स्पोर्ट्स लीग्ज आहेत, हॉलिवूड आहे आणि तरीही नाट्यव्यवसाय अगदी जोमाने चालू आहे. आज या विरुध्द टीव्ही आणि चित्रपटांच्या माऱ्यानं भारतात व्यावसायिक नाटकांची काय अवस्था केली आहे ते आपण जाणतोच. असं काय आहे ब्रॉडवे शोमधे ज्यामुळे रसिक शेकडो डॉलर्सची तिकिटं घेऊन प्रत्येक शो हाऊसफुल्ल करतात? चिराग तुला काय वाटतं ब्रॉडवे वरचं नाटक पाहायला प्रेक्षक नेहमी का गर्दी करतात?

**चिराग:** अमेरिकन संगीत नाटक साधारणपणे १९१० पासून अस्तित्वात आहे. ब्रॉडवेला रसिकांची नस आता कळलेली आहे. लोकांना बघायला काय आवडतं हे त्यांना चांगलं कळतं. आणि त्याहीपेक्षा एक मोठा भाग म्हणजे ब्रॉडवे शो आणि त्याचे प्रेक्षक ह्यांच्यामध्ये एक जादूई नातं घडत असतं. प्रत्येक शोमध्ये हा त्या नात्याचा जिवंतपणा असतो. जो तुम्हाला टीव्हीवर मिळत नाही. जो तुम्हाला सिनेमात मिळत नाही. नाटकाच्या जादूचा हा परिणाम वैयक्तिक असतो, खास तुमचा अनुभव असतो. प्रेक्षकांना ते जाणवतं, आणि ते त्या अनुभवाला मनापासून प्रतिक्रिया देतात. त्याच्याशी जोडले जातात. आणि जेव्हा असा एक तयार नटसंच तुमच्यासमोर येतो की जे त्यांचं संपूर्ण आयुष्य असा जिवंत रसरशीत अनुभव स्टेजवर कसा निर्माण करायचा हे शिकलेले आहेत तेव्हा त्या नाटकाचा प्रेक्षकांवरचा परिणाम अद्भुत होतो, त्यांची मनं जिंकून घेणारा ठरतो! आणि म्हणूनच जेव्हा जेव्हा लोक न्यू यॉर्कला भेट देतात तेव्हा स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आणि एम्पायर स्टेट बिल्डिंगला भेट दिली, की लगेच 'ब्रॉडवे'कडे नाटक बघायला धाव घेतात!

**उदयन:** ह्या रसिकांना डोक्यावर घेतलेल्या नाटकात भारतीय वंशाचे कलाकार खूपच कमी. गोऱ्या वंशाचे सोडून बाकी इतर वंशाच्या कलाकारांना ॲक्टर ऑफ कलर असं म्हटलं जातं (BIPOC ॲक्टर्स म्हणजे ब्लॅक, इंडिजिनस आणि पर्सन्स ऑफ कलर). मीन गर्लसच्या संपूर्ण संचात चिराग आणि अजून एक असे दोनच भारतीय वंशाचे कलाकार होते. त्यामुळं अपेक्षांचं ओझं चिरागच्या मनावर असणं अगदी साहजिकच होतं. चिराग, ब्रॉडवे वर काम करणारा भारतीय वंशाचा एक कलाकार म्हणून तुझा अनुभव काय होता? ती एक मोठी संधी तर आहेच पण जबाबदारीही तितकीच मोठी आहे ना?

**चिराग**: हे फारंच महत्वाचं आहे कारण गोरे सोडून इतर वंशाचे कलाकार इतके कमी असतात, आणि त्यातही भारतीय कलाकार फारच कमी की मला नेहेमी ह्याची जाणीव असते, की मी जे काही करतोय त्याचा भला-बुरा परिणाम भविष्यात येणाऱ्या इतर भारतीय वंशाच्या कलाकारांवर होणार आहे. केवळ भारतीयच नाही तर इतरही नव्या कलाकारांवर होणार आहे. ही जास्तीची जबाबदारी मला नक्कीच जाणवते. मी जर काम चांगलं केलं नाही तर भारतीय कलाकारांवर धब्बा बसेल ह्याची मला काळजी नक्कीच आहे आणि मी त्याचा गंभीरपणे विचार करतो.

**उदयन:** मित्रहो, चिराग नुसताच ॲक्टर, डान्सर आणि रॅपर नाहीये. तो एक उत्तम नाटककारही आहे. आणि त्यात काही नवल नाही. त्याचे आजोबा प्रतिथयश मराठी लेखक आहेत, वडील प्रसिध्द मराठी अमेरिकन लेखक आहेत. नाटककार आहेत, चिरागचा नाट्य लेखनाचा प्रवास खरं तर नाटकाच्याही आधी सुरू झाला आणि तो आजही चालू आहे. चिराग तुझ्या लेखांबद्दल आता आपण बोलूया. तू लेखनाला कधी सुरुवात केलीस आणि तुझ्या कलात्मक जीवनात लेखनाचं स्थान काय आहे?

**चिराग**: माझा लेखनाचा पहिला निभाव मला आठवतो आहे तो पाचवीतला. दर मंगळवारी गुणवान (गिफ्टेड) विद्यार्थ्यांसाठी असलेला एक क्लास होता. तिथे आम्हाला एक छोटं नाटक लिहायला सांगितलं गेलं. मी नाटक लिहिलं ज्याची मूळ कल्पना मी एका लहान मुलांच्या टीव्ही शो "झुम्ड" मधून घेतली होती. अशी नाटकं आम्ही लिहिली, ती बसवली, रेकॉर्ड केली आणि सगळ्यांना वर्गात दाखवली सुध्दा! माझं नाटक जेव्हा मुलांनी पाहिलं तेव्हा माझे जोक त्यांना आवडले आणि मुलं खूप हसत होती. ते जेव्हा मी बघितलं, तेव्हा मला खूप बरं वाटलं. पुढे हायस्कूलमध्ये माझ्या असं लक्षात आलं की निबंधाच्या ऐवजी शिक्षक आपण लिहिलेलं छोटं नाटक स्वीकारतात! निबंध लेखन मला किचकट वाटायचं तर नाटक लिहिण्यात मला खूप मजा यायची. अर्थात माझे वडील नाटक लिहितात, कथा लिहितात आणि त्यांना जेव्हा मी नाटक लिहितो आणि मला त्याची आवड आहे हे कळलं तेव्हा त्यांनी मला खूप प्रोत्साहन दिलं, मार्गदर्शन केलं. मग मी माझ्या हायस्कूलमध्ये काही नाटकं लिहिली त्यातली काही बसवलीसुध्दा गेली. मग पुढे मी जेव्हा कॉलेजला गेलो तेव्हा मी तिथे नवोदित लेखकांसाठी असलेल्या एका नाट्यलेखन स्पर्धेत भाग घेतला आणि चक्क माझ्या एकांकिकेला पहिलं बक्षीस मिळालं. ते बक्षीस असं होतं की माझी एकांकिका बसवली गेली!

**उदयन:** आपण लिहिलेल्या नाटकाची निर्मिती होताना बघणं हा एक अद्भुत आनंद असतो ना?

**चिराग:** त्या अनुभवाचं वर्णन करता येणार नाही. माझ्या नाटकासाठी ऑडिशन घेतल्या गेल्या, नट निवडले गेले आणि तालमीच्या खोलीत मी जेव्हा पोचलो तेव्हा मी लिहिलेले शब्द लोक पाठ करून आले होते! कधी कधी एखादा नट येऊन विचारायचा, "हे तू लिहिलंस तेव्हा तुझ्या मनात काय होतं? तुझ्या कल्पनेत कोणता प्रसंग होता?" असं ऐकलं की नम्र व्हायला होत असे. कारण दुसरा कोणीतरी नट तुझ्या निर्मितिक्षमतेवर भरवसा ठेवतो आहे, त्याच्यावर अवलंबून रहातो आहे हे पाहिलं, की लेखक म्हणून असलेल्या जबाबदारीची जाणीव व्हायची. कॉलेजमध्ये माझी पहिली एकांकिका सादर झाल्यावर ती बघून एक प्रोफेसर माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, "तू लिहीत राहिलं पाहिजेस!" अशा तऱ्हेने माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात लेखन मला साथीला आहे. आणि आत्ता मी तुझ्याशी बोलतोय तर मी एका पूर्ण चित्रपटाची पटकथा लिहितो आहे.

**उदयन:** चिराग स्वत:ची पहिली पटकथा लिहितो आहे. सगळ्याच नव्या लेखकांप्रमाणे ही पटकथाही काही अंशी त्याच्या स्वत:च्या आयुष्यावर बेतलेली आहे. चिराग ही पटकथा आत्मकथनपर आहे का?

**चिराग:** हो - ही पटकथा एका मराठी अमेरिकन मुलाची नक्कीच आहे. मी शिकत असताना मला सांगण्यात येत असे, की मी पर्सन ऑफ कलर असल्यामुळे तुलाच तुझ्या भूमिका लिहाव्या लागतील. कंटेन्ट लिहावा लागेल कारण तुम्ही काम करू शकाल अशी नाटकं सध्या अस्तित्वातच नाहीत. कारण येथे तितके भारतीय लेखक, नट झालेच नाहीयेत. माझं एक मोठ्ठं प्रेरणास्थान लिन मॅन्युएल मिरांडा ('हॅमिल्टन', 'इन द हाइट्स' अशा अत्यंत सुप्रसिध्द ब्रॉडवे नाटकांचा लेखक, दिग्दर्शक, निर्माता आणि नट) आहे - तो स्वतःच स्वतःसाठी आणि त्याच्यासारख्या लॅटिन अमेरिकन नटांसाठी भूमिका लिहितो. तो जर असं करतो तर मी सुध्दा तसंच केलं पाहिजे असं मला वाटतं. ह्यातून मला माझ्या कामाची सोय करता येईल आणि त्याचप्रमाणे माझ्यासारख्याच ब्रॉडवेवर कमी संधी असलेल्या इतर नटांची सोयसुध्दा त्यातून होईल. असे काही लोक मी पहिले आहेत, की जे खूप विनोदी काम करतात पण त्यांना ब्रॉडवेवर संधी मिळत नाहीये. तर त्यांना ह्याचा लाभ होईल.

**उदयन:** मंडळी चिरागनं मांडलेला हा मुद्दा फार महत्वाचा आहे. भारतीय वंशाच्या कलाकारांसाठी आधीच भूमिका कमी असतात. जरी अलिकडे परिस्थिती बदलली असली तरीही. मग अशा कलाकारांनी काय करायचं? कामांची, एखाद्या चांगल्या भूमिकेची वाट पहात थांबायचं, की आपल्याला पाहिजे ती भुमिका आपण स्वत:च लिहायची? आणि पुन्हा एकदा चिरागनं इथं वेगळा मार्ग निवडला आहे. नाटक आणि लिखाणाबरोबर तो टीव्हीवर काम करायचा प्रयत्न करतो आहे. चिराग तुझ्या एचबीओच्या टीव्ही मालिकेबद्दल आम्हाला सांग. तुला टीव्हीवर काम करायला आवडलं का?

**चिराग:** मला टीव्हीवर अजून काम करायला नक्कीच आवडेल. नाटक आणि सिनेमाचं आकर्षण वेगळंच आहे. पण नाटकापेक्षा ते काम फारच वेगळं आहे. त्यातल्या ऑडिशनमध्ये त्यांना जे काही हवं आहे ते तुम्ही करू शकलात, की त्यांना पुरतं - मग तुम्ही चांगला अभिनय करणारे नट आहात की नाही हे तिथे दुय्यम ठरतं! त्यामुळे त्या ऑडिशनचं प्रेशर कमी वाटतं.

**उदयन:** चिरागनं अतिशय कष्टानं ब्रॉडवेवर आपलं नाव नोंदवलं आहे, २२-२३ वर्षांच्या कोवळ्या वयात! त्याच्या ह्या यशात त्याच्या कष्टांएवढाच त्याच्या आईवडिलांच्या पाठिंब्याचा सहभाग आहे. अजून त्याला खूप काही करायचं आहे. स्टेजवर, टीव्हीवर, लिखाणात. त्याच्यामागून येणाऱ्या त्याच्यासारख्याच कलाप्रेमी मराठी अमेरिकन आणि सगळ्याच मुलांना आणि मुख्यत: त्यांच्या पालकांना चिरागनं एक अतिशय महत्वाचा संदेश दिला आहे. मंडळी, तर ही होती चिराग मनोहरची मराठी अमेरिकन अद्भुत कथा! असे अनेक चिराग मनोहर मराठी अमेरिकन आणि जगभर पसरलेल्या इतर ठिकाणच्या मराठी समाजात दडले आहेत. त्यांना पुढे येण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी गरज आहे ती त्यांच्या पालकांच्या पाठिंब्याची आणि एका संधीची. चिरागला हार्दिक शुभेच्छा आणि मनापासून धन्यवाद!

***

## हरवलेला शेवटचा मित्र

- **अस्मिता मोडक** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)



कौस्तुभ आज सकाळपासून भलताच खुश होता. शेजारी राहणाऱ्या त्याच्या जवळच्या मित्राच्या, स्वप्नीलच्या आजीने आज त्याच्यासाठी बेसनाचे लाडू खास करून पाठवले होते. अमेरिकेत आईवडिलांबरोबर राहत असलेल्या कौस्तुभसाठी आजीआजोबा एक वेगळेच समीकरण होते. त्याचे बाबा, अविनाश पीएचडी करण्यासाठी इथे आला होता आणि आपल्या डॅडला आईवडील नाहीत किंवा इंडियामध्ये कोणीच नातेवाईक नाहीत इतकेच त्याला माहीत होते. तो लहान असताना त्याच्या आईचे, सायलीचे आईवडील त्याच्या ३-५ वर्षाच्या दरम्यान एका अपघातानंतर पाठोपाठ वारले होते. कौस्तुभला ते केवळ फोटो मधूनच आठवत.

अशावेळी गेले २-३ आठवडे स्वप्नीलच्या आजीच्या हातचं जेवायला जाणं, आजीआजोबांशी त्यांच्या लहानपणीच्या गप्पा, गोष्टी ऐकणं, आजोबांशी "स्पोर्ट्स, गाणी" अशा इंडियामधल्या गप्पा मारणं हे कौस्तुभला फारच आपलंसं करून टाकत होतं. तो जवळपास रोज स्वप्नीलकडेच असायचा हल्ली! एक दिवस आजीआजोबा आणि त्यांच्या कुटुंबाला घरी जेवायला बोलवूया का, असा विचार त्याच्या मनात येऊन गेला. सायली लगेच तयार झाली पण अविनाशबरोबर बोलून ठरवू असं तिला वाटलं. अविनाश ऑफिसच्या कामात किती व्यस्त आहे, त्याचे अनेक प्रश्न येतील या विचाराने तिच्या मनात चलबिचल चालू झाली. ही अस्वस्थता तिच्यासाठी काही नवीन नव्हती. आणि त्यात कोणाचे तरी आईवडील....त्यांना बोलवायंच...? अविनाशला पटवणं एक मोठं आव्हान होतं. पण कौस्तुभच्या आनंदासाठी हे शिवधनुष्य तिने उचलायचं ठरवलं.

रात्री अविनाशच्या मनाचा अंदाज घेऊन विषयाला हात घातला. कौस्तुभला ते शेजारचे आजी, आजोबा किती आवडू लागले आहेत, कित्येक वर्षांनी असं शेजारीच कोणी तरी आजीआजोबा राहायला येणं, तो रोज त्यांना भेटणं आणि त्याच्या डोळ्यात दिसत असलेली आजीआजोबांची कमी अशी अनेक परिस्थितीजन्य कारणं सायलीने अविनाशसमोर ठेवली. अविनाशच्या सगळ्या गोठलेल्या आठवणी जाग्या झाल्या. का हे नको असलेले, दूर लोटलेले आठवणींचे अवशेष पुन्हा पुन्हा माझ्यासमोर उभे येऊन ठाकतात, या विचारांनी तो सायलीकडे एकटक पाहत राहिला. पण बघता बघता तिच्या चेहऱ्यावरचे आशेचे, उंचावलेल्या अपेक्षांचे भाव त्याला अस्वस्थ करून गेले. इथे अमेरिकेत राहत असताना ज्या एकमेव मुलाला मी प्रत्येक क्षणी मित्रासारखा वागवायला बघतो, त्याला झालेला छोटासा त्रास पण मला सहन होत नाही, त्याच्या आनंदासाठी मी इतका झटतो, त्याची आजीआजोबांना बोलवायची ही एक इच्छा मी पूर्ण करू शकणार नाही का?....विचारांमध्ये नकळत त्याने सायलीला होकार देऊन टाकला. सायलीला काय करू आणि काय नको असे झाले. आईवडील गेल्यानंतर गेल्या २-३ आठवड्यातला शेजारच्या आजीआजोबांचा सहवास तिलाही सुख देणारा होता.

सकाळी उठल्याबरोबर ही बातमी सायलीने कौस्तुभला सांगितली. कौस्तुभला वाटले, की आजीआजोबा येतील तेव्हा काहीतरी “स्पेशल” केलेच पाहिजे. मागच्या आठवड्यात त्यांच्या लग्नाच्या ५०व्या वाढदिवसाच्या दिवशी कौस्तुभ आणि स्वप्नीलने केलेले डेकोरेशन त्याच्या लक्षात होते. मग त्याला वाटले, की असेच डेकोरेशन आपणही केले तर? आईला विचारून त्याने डेकोरेशनचा बॉक्स ॲटिकमध्येच आहे ना, ह्याची खात्री करून घेतली. सायलीला आज दोन दिवसांसाठी एका कॉन्फरन्ससाठी दुसऱ्या शहरात जावे लागणार होते. जेवणाची तयारी आपण आल्यावर करू, असे ठरवून ती कॉन्फरन्सला निघून गेली. अविनाश ऑफिसला गेला आणि शाळेतून घरी आल्यावर डेकोरेशनचा बॉक्स शोधू, या विचारात कौस्तुभ पण शाळेत गेला.

आज या कोवळ्या १५ वर्षाच्या कौस्तुभसाठी दिवस फारच रेंगाळत जात होता. कधी एकदा घरी पोहचतो असे त्याला झाले होते. शेवटी २ वाजता घरी आल्यावर खाणं पिणं बाजूला ठेऊन आधी त्यानी ॲटिककडे धाव घेतली. बॉक्सेसची, पिशव्यांची शोधाशोध सुरू केली. त्याला काही केल्या ते सहजासहजी सापडत नव्हतं. बाबा बरेचदा ॲटिक आवरून ठेवतात आणि आई इथे येत पण नाही. मग बाबांनी तो बॉक्स दुसरीकडे तर ठेवला नसेल? कौस्तुभच्या मनात शंकांचं जाळं पसरलं होतं. अचानक, एका कोपऱ्यात झाकून ठेवलेल्या बॉक्समध्ये त्याला ७-८ पत्र मिळाली. ही अशी झाकून का ठेवली असावीत हे त्याला समजत नव्हतं. ती मराठी मध्ये लिहिलेली होती पण लहानपणी मराठी शाळेत जात असल्याने त्याने थोडे शब्द वाचण्याचा प्रयत्न केला. त्यावर, "अविनाश", "राग सोड", "बाळाला घेऊन ये" असे थोडेफार त्याला वाचता आले. खाली लिहिले होते "तुझी आई"! प्रत्येक पत्राखाली "तुझी आई" हेच लिहिलेले त्याला दिसले. अपुऱ्या सरावामुळे बाकी शब्दांचा त्याला तुटक अर्थ लागत होता. एक अगदी अलीकडंच पत्र त्याला सापडलं आणि त्यात उल्लेख होता "तुझे बाबा"," भेटून जा" ह्या शब्दांचा! आता मात्र कौस्तुभला ह्या सर्वाचा अर्थ जाणवू लागला होता! हे आपल्या डॅडचे आईवडील असावेत अशी त्याला शंका आली होती.

एकेक संदर्भ मनांत लागत गेले, तसे कौस्तुभच्या मनाची घालमेल सुरू झाली. "डॅडला आईवडील माहीत नव्हते, डॅड त्यांच्याबद्दल कधी घरी बोलत पण नाही, मग ही पत्र कशी आली? माझ्या लहानपानपासून मी हेच का ऐकले आहे, की डॅडला आई- वडील नाहीत. आपली आई आणि डॅड दोघे डॅडच्या आईवडिलांबद्दल कधीही घरी बोलत नाहीत. त्यांचा एकही फोटो घरी नाही. आईच्या आईबाबांचे फोटो पण आहेत माझ्याबरोबरचे. मग डॅडचे आईवडील जर कधीच नव्हते, तर ही पत्रं त्याच्या आईने त्याला कशी आणि कधी लिहिली?" कौस्तुभने पत्रांवरच्या तारखांकडे लक्ष दिले तर त्यावर २००४, २००६, २००७ अशी वर्ष होती. त्याची आता खात्री पटली, की ही पत्रं डॅडला त्याच्या आईनंच लिहिली आहेत. मग मला कधीच का याबद्दल नाही सांगितले? माझे आजीआजोबा जर आहेत, तर त्यांच्या बद्दलची एकही चर्चा का घरी होत नाही? त्याच्या मनात विचारांनी थैमान घातले.

कौस्तुभला प्रचंड राग आला होता. इतकी मोठी गोष्ट आपल्याला आई आणि डॅड दोघांनी सांगितली नाही हा विचार करूच त्याचा संताप अनावर झाला होता. एक क्षणभर त्याला वाटलं, की आत्ताच्या आता डॅडला फोनकरून सगळं विचारूया! पण दुसऱ्या क्षणी त्याला जाणवलं, की ऑफिसमध्ये त्याला असं विचारणं बरोबर नाही. पण त्याला काही सुचत नव्हते. तो तडक निघाला आणि ती सगळी पत्रं घेऊन शेजारच्या पार्कमध्ये जाऊन बसला. त्या पत्रांकडे बघता बघता, कधीही न पाहिलेल्या त्या आजीआजोबांचा विचार करता करता, नकळत त्याच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागले. स्वप्नीलच्या आजीआजोबांबरोबर घालवत असलेले सध्याचे २-३ आठवडे त्याच्या डोळ्यासमोरून जात होते. आजीआजोबा आपल्या आयुष्यात किती महत्वाचे आहेत हे पटलं होतं. आपल्या डॅडचे आईबाबा, म्हणजे आपले आजीआजोबा हे एक वेगळंच समीकरण आहे याची त्याला पुरेपूर खात्री झाली होती. आणि ते डॅड नी लपवून ठेवलं? कित्येक तास तो तसाच तेथे बसून होता. अचानक डॅडचा फोन वाजला आणि तो भानावर आला. मी घरी गेलो नाही तर डॅड काळजी करेल म्हणून शेवटी ती पत्रं खिशात लपवली. रात्री डॅड बरोबर जेवताना, दुसऱ्या दिवसाची तयारी करताना, प्रत्येक वेळी त्याला वाटत होते, की डॅडला सरळ

तोंडावर विचारून टाकावं. पण डॅड कशा प्रकारे याबद्दल बोलेल याचा त्याला काहीच अंदाज येत नव्हता. आज रात्री नको, पण उद्या आई परत आल्यावर आईला विचारू असं त्याने ठरवलं. झोपताना सुध्दा ती पत्रं हाताशी धरत, खिडकीकडे बघत कधी झोप लागली ते त्याला कळलंच नाही.

अविनाशला कौस्तुभ घरी आल्यापासून नक्कीच काहीतरी वेगळं जाणवत होतं. जेवताना त्याचं लक्ष नव्हतं, विचारलेल्या एकाही प्रश्नाचं तो धड उत्तर देत नव्हता. अविनाश त्याच्या काळजीने झोपायच्या आधी त्याच्या खोलीत गेला आणि... समोर त्याला जमिनीवर पसरलेली पत्रं दिसली. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. त्याला काहीच उलगडत नव्हतं. "कौस्तुभच्या हातात ही पत्रं कशी आली? त्याला सगळं कळलं तर नसेल ना? त्याला माझ्या बद्दल काय वाटलं असेल? म्हणून तो जेवताना स्वतःच्याच विचारात होता का? कौस्तुभने मला याबद्दल विचारलं तर मी काय सांगू? सायली पण नाहीये सध्या! तिचं आणि माझं ठरलं होतं, की कौस्तुभला कधीही हे सांगायचं नाही. मग कौस्तुभने जर विचारलं आणि मला सांगावेच लागलं तर? का स्वतःहून सांगू हे सगळं? नाही सांगितलं तर कौस्तुभचा माझ्यावरचा विश्वास कायमचा उडेल. तो माझ्यापासून दूर जाईल."... अशा विचारांनी अविनाशची धडधड वाढत होती. रात्रभर अविनाशच्या डोळ्याला डोळा लागला नाही. कौस्तुभ आपल्यापासून दुरावू होऊ नये म्हणून हे सर्व त्याला सांगावेच लागेल असा अविनाशने निर्णय घेतला.

अविनाशने सकाळी उठल्याबरोबर कौस्तुभसाठी त्याचे आवडते पॅनकेक्स बनवले. कौस्तुभला ज्यामुळे आनंदात ठेवता येईल असं सगळं काही आज करायचं त्याने ठरवलं होतं. पण कौस्तुभ खाली आला आणि त्याच्या चेहऱ्यावरचे निर्विकार भाव पाहून अविनाशच्या मनात पुन्हा खळबळ माजली. कसं आणि कुठून सुरुवात करू ते त्याला समजत नव्हतं. कौस्तुभ एका क्षणासाठीही त्याच्या डोळ्यात डोळे घालून बघत नव्हता. ते पॅनकेक्स संपवताना एकेक घासाबरोबर कौस्तुभच्या डोळ्यातली आजीआजोबांची कमी जाणवून अविनाशला प्रत्येक हुंदका आवळणं कठीण झालं होतं. कौस्तुभ मात्र ब्रेकफास्ट संपवून एका डोळ्यात राग आणि दुसऱ्यात दुःख घेऊन तिथून जाणार इतक्यात अविनाशने त्याला हाक मारली आणि थांबवलं.

"तुला सापडलेल्या पत्रांचा विचार करतोयस ना?" कौस्तुभ त्याच्याकडे एकटक बघत राहिला. अविनाश म्हणाला "हो, जी तुला शंका येतेय ती खरी आहे कौस्तुभ! हि सगळी पत्रं माझ्या आईची आहेत. तुझ्या आजीची! आणि तुझी आजी आणि आजोबा आहेत इंडिया मध्ये! पण मी नाही हे सांगितलं कधी तुला! तुझी आई आणि मी हे ठरवलं होतं. खूप काही कारणं आहेत यामागे! तू प्लीज असा चिडू नकोस. मी सगळं सांगतो तुला!" पण कौस्तुभने काही ऐकायच्या आधीच "how could you do this to me डॅड? You shouldn't have kept this secret from me. I don't like you at all!" अशा शब्दात अविनाशवर मनातला सगळा राग काढायला सुरुवात केली.

"अरे कौस्तुभ, ऐकून तर घे माझं! हे सगळं करताना मला पण चांगलं वाटतं नव्हतं. माझ्या बाबांचे गाण्याचे क्लासेसहोते. ते अतिशय सुंदर गायचे आणि माझा आवाज चांगला होता म्हणून शिकवायचे. पण मला इथे अमेरिकेत येण्याची इच्छा होती आणि माझ्या बाबांचा हट्ट होता, की मी तेथे राहून त्यांचे क्लासेस चालवावे. आमच्यात बरीच भांडण होत असत यावरून. मी माझ्या हिमतीवर, स्कॉलरशिप मिळवून इथंपर्यंत आलो, तरी त्यांनी माझं कधीही विशेष कौतुक केलं नाही. आईला पण मी त्यांचेच ऐकावं, असं वाटत असे. मी अमेरिकेत निघून गेलो आणि त्यांना त्यांच्या नातेवाइकांसमोर खोट्यात पाडलं, त्यांचा अपमान झाला हेच ते मनात धरून राहिले. पण मला काय आवडतं हे त्यांनी समजून घ्यायचा प्रयत्न पण केला नाही. माझ्या लहान बहिणीचं, मंजुषाचं त्यांनी तिला न विचारता लग्न लावून दिलं. आणि मी इथे येण्याच्या गडबडीत असल्याने तिला कुठलीही मदत करता आली नाही. तरीही मी ३-४ वर्षांनंतर परत गेल्यावर

मला वाटत होतं, की बाबा सर्व विसरतील. पण मी त्यांची कला जपली नाही, ह्याचा त्यांनी खूपच राग ठेवला मनात! त्यावेळी मंजुषा सुध्दा खूप वाईट वागली माझ्याशी! मी त्यांना केवळ सहानुभूती दाखवायला आलो आहे, अमेरिकेत मिळत असलेल्या पैशांचा माज दाखवत आहे, बहीण म्हणून माझी तेव्हा आठवण आली नाही आणि आता का इथे आलास? असे अनेक आरोप तिने माझ्यावर केले. आईची यात मोठी ओढाताण झाली होती. पण तिचं सुरवातीपासूनच बाबांपुढे काहीच चालत नसे. पण मी सायलीशी लग्न करायचं ठरवल्यावर सुध्दा मला आईच्या पत्रांशिवाय काहीही मिळालं नाही. बाबा आणि मंजुषा यांनी मला त्यांच्या आयुष्यातून वेगळं केलं होतं. आणि तुझ्या आईला आणि मग तुला तिथे पुन्हा नेऊन तरी काय मिळणार होतं? मी आणि सायलीने हे स्वीकारलं आणि म्हणून तुला याबद्दल कधीच काही सांगितलं नाही."

कौस्तुभ हे सर्व ऐकून घेत होता पण त्याला हे मनातून पटत नव्हतं. आपले आजीआजोबा आहेत आणि आपण त्यांना बघू आणि भेटू शकत नाही यावर तो खूप नाराज होता. "I don't agree with you dad on this! You can solve these issues if you understand my feelings. But you don't want to understand my feelings at all! Now you are behaving just like

your डॅड! इतकंच बोलून तो निघून गेला. स्वप्नीलच्या आजीआजोबांच्या बरोबरचे प्रत्येक क्षण कौस्तुभला आठवत होते. हे सर्व आपले आपल्या आजीआजोबांबरोबर असते, डॅड मनात आलं तर सगळं विसरून आपल्यासाठी त्यांना घेऊन आला असता, डॅडला आपल्याबद्दल काहीच वाटत नाही, अशा विचारांनी त्याच्या मनात प्रचंड उलथापालथ झाली होती.

अविनाशचा पूर्ण दिवस खूप वाईट गेला. दिवसभर कौस्तुभ त्याच्या विश्वात होता. रात्री सायली आली आणि तिचं आवरून होताच अविनाशने तिला सर्व हकीकत सांगितली. हे सर्व कधीतरी घडेल असं सायलीला वाटत होते पण अशा वाईट प्रकारे समोर येईल याची जराही कल्पना नव्हती. सकाळी तिने कौस्तुभशी बोलायचा प्रयत्न केला पण कौस्तुभने स्वतःला स्वतःभोवती कोंडून घेतल होतं. त्या दोघांनी दिलेलं एकही कारण त्याला पटत नव्हतं. सायली आणि अविनाशला हे सर्व बघवत नव्हतं. आपल्या मुलाला ह्या मानसिक त्रासातून, गैरसमजातून बाहेर काढणं आवश्यक होतं. कौस्तुभसाठी त्याला त्यांच्या आजीआजोबांच्या रूपातील एक नवीन मित्र मैत्रीण मिळणं गरजेचं होतं. दिवसभर अविनाश विचार करत होता. स्वतःचा अहंकार जपताना माझ्या मुलासाठी मी त्याचा एक खराखुरा शेवटचा मित्र हिरावून घेऊ शकत नाही हे अविनाशला जाणवत होतं. रात्री जेवताना कौस्तुभच्या शांत चेहऱ्यावर राग, अविश्वास, गैसमज असे अनेक भाव दिसत होते. आपला मुलगा आपल्याशी बोलत नसेल तर वडिलांच्या मनाची होणारी घालमेल त्याला जाणवू लागली. आपणही

आपल्या वडिलांचे मन जाणून नाही घेऊ शकलो, त्यांच्याशी व्यवस्थित चर्चा करून हे भांडण मिटवू नाही शकलो, याची खंत आता त्याला वाटू लागली. गेली कित्येक वर्षे ते कोणत्या मानसिक अवस्थेतून गेले असतील याची हुरहूर वाटू लागली. आणि अचानक अविनाशचा हात फोनकडे वळला आणि तो ०११-९१-.......... या नंबरावर स्थिरावला! रात्रीच्या अंधाऱ्या काळोखाच्या क्षणी कौस्तुभच्या चेहऱ्यावर मात्र मंद हास्याचा प्रकाश झळाळत होता!

****************************************************************************